संस्थापक-नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

संपादकीय

नवा काळ

।। न मे भक्त प्रणश्यति ।।

# उत्तरप्रदेश राजकीय रणसंग्रामाचा केंद्रबिंदू

**काँग्रेसने** लोकसभा निवडणुकीसाठी जोरदार तयारी सुरु केली आहे. प्रियांका गांधींची पूर्व उत्तरप्रदेशच्या महासचिवपदी नियुक्ती करून पक्षाध्यक्ष राहुल गांधी यांनी सर्वांना धक्का दिला आहे. सर्वात महत्वाचे म्हणजे प्रियंका गांधी यांनी अशा प्रकारची जबाबदारी स्वीकारण्याची तयारी दाखवली. हीच सर्वात मोठी बाब म्हणावी लागते. आतापर्यंत प्रियंका गांधी या कोणतीही जबाबदारी स्वीकारीत नव्हत्या. किंवा अशी जबाबदारी घेण्यासाठी टाळाटाळ करीत होत्या. मात्र आता जर त्यांनी हे पद स्वीकारले असेल तर योजनापूर्वक त्यांनी लोकसभा निवडणुकीत उतरण्याचा निर्णय घेतलेला दिसतो. ज्याअर्थी त्यांनी पक्षाचे पद स्वीकारण्याची तयारी दाखवली किंवा राहुल गांधी यांनी त्यांना या प्रकारचे पद देऊ केले. याचा अर्थ आगामी लोकसभा निवडणुकीत प्रियांका गांधी याही काँग्रेसच्या उमेदवार असतील थोडक्यात सांगायचे तर ज्या उत्तरप्रदेशवर भारतीय जनता पार्टीने सर्वाधिक लक्ष केंद्रीत केले आहे आणि बहुजन समाज पार्टी तसेच समाजवादी पार्टी यांनी काँग्रेसला बाजूला ठेवून युती करण्याचा जो निर्णय घेतला त्यालादेखील मोठे आव्हान उभे करण्याचे धोरण यामधून दिसून येते. म्हणूनच उत्तरप्रदेशमध्ये या लोकसभा निवडणुकीत राहुल गांधी, सोनिया गांधी आणि प्रियंका गांधी हे तिघेही उमेदवार म्हणून निवडणुक लढवणार असतील तर एकूणच लोकसभा निवडणुकीतली चुरस आणखीनच वाढेल. त्यातही उत्तरप्रदेशातली निवडणुक सर्वाधिक चुरशीची ठरेल असे म्हणायला हरकत नाही. भारतीय जनता पार्टीने योगी आदित्यनाथ यांच्या भरोशावर ही निवडणुक लढवण्याचा निर्णय जरी घेतला असता तरीदेखील आता बसपा आणि सपा या युतीच्या आव्हानाबरोबरच काँग्रेसने आखलेली नवी रणनीतीसुध्दा भाजपाच्या नाकात दम आणणारी ठरू शकेल. काहीशी मरगळ आलेल्या काँग्रेसला मध्यप्रदेश, छत्तीसगढ आणि राजस्थानमधील विजयानंतर उभारी मिळाली आणि आता प्रियंका गांधी यांना मैदानात उतरवून पक्षाने सर्व शक्तीनिशी ही निवडणुक लढवण्याचे अघोषित संकेतच दिले आहेत.

### राहुल यांची राजकीय खेळी

आगामी लोकसभा निवडणुकीत पुन्हा एकदा उत्तरप्रदेश हे राजकीय रणसंग्रामाचे प्रमुख केंद्र असेल असे म्हणायला हरकत नाही. काँग्रेसने प्रियंकांना उतरवून एक षटकारच ठोकला आहे. सपा, बसपा युतीने जरी काँग्रेसला बाजूला ठेवले असले तरी आता प्रियंका गांधींची लोकप्रियता पक्षाला मदतीचा मोठा हात देणारी ठरू शकेल. या दोन प्रमुख घडामोडीनंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी हेदेखील उत्तरप्रदेशात वाराणसीतूनच निवडणुक लढवतील म्हणजे पंतप्रधानांचा मतदार संघदेखील उत्तरप्रदेशात असल्याने स्वतः त्यांचे आणि भाजपाचे सर्व लक्ष उत्तरप्रदेशकडे राहील. आतापर्यंत जेवढे पंतप्रधान झाले त्यापैकी ९० टक्के पंतप्रधान हे उत्तरप्रदेशमधूनच निवडून आल्याचे दिसून येते. पंडित जवाहरलाल, नेहरू , लालबहादूर शास्त्री, इंदिरा गांधी, राजीव गांधी, चंद्रशेखर, चौधरी चरणसिंग, विश्वनाथ प्रतापसिंग आणि आता नरेंद्र मोदीसुध्दा उत्तरप्रदेशाचेच प्रतिनिधी मानले जातात. याही लोकसभा निवडणुकीत देशाचा पंतप्रधान कोण असेल हे ठरवण्याचे काम उत्तरप्रदेश करेल अशा सगळ्या राजकीय गणितांची मांडामांड झाली आहे. काँग्रेसने पूर्ण ताकदीनिशी उतरताना प्रचारात किंवा राजकीय डावपेचांमध्ये कसूर सोडायची नाही हे नक्की केलेले दिसते. ज्या उत्तरप्रदेशातून ८० खासदार निवडून येतात. तिथल्या विजयासाठी सर्व प्रकारचे डावपेच खेळण्याचा शिवाय सर्व प्रकारच्या तडजोडी करून आपले महत्व वाढवण्याचा काँग्रेसचा हा प्रयत्न निश्चितच धाडसाचा ठरतो. प्रियंका गांधीविषयी काँग्रेसच्या एका मोठ्या वर्गामध्ये विशेष सहानुभूती आहे. दोन वर्षापूर्वी राहुल गांधींच्याऐवजी प्रियंका गांधींनी काँग्रेसचे अध्यक्ष करावे अशी जोरदार मागणी ज्येष्ठ नेत्यांनी केली होती. राहुल गांधींपेक्षाही प्रियंका गांधी यांना सर्वाधिकलोकप्रियता मिळू शकते. त्यांची चेहरेपट्टी शिवाय भाषण करण्याची पध्दत ही इंदिरा गांधींशी मिळती जुळती आहे. म्हणूनच इंदिरा गांधींसारखीच लोकप्रियता प्रियंका गांधींना मिळू शकते आणि त्यामधून काँग्रेसचा मोठा राजकीय फायदा होऊ शकतो. आता तर स्वतः प्रियंका गांधी यांनीच पक्षाची जबाबदारी स्वीकारण्याचा निर्णय घेतल्यामुळे या पक्षात नवे चैतन्य निर्माण होऊ शकते. राहुल गांधींना मिळत असलेले यश आणि त्यात प्रियंका गांधींची मदत या दोन्हींच्या संयुक्त परिणामातून काँग्रेसला अपेक्षित उद्दीष्ट गाठता येऊ शकेल.

### भाजपाची पंचाईत

सुरुवातीला म्हटल्याप्रमाणे उत्तरप्रदेश हे आगामी रणसंग्रामाचे केंद्र राहील. म्हणजेच या राजकीय कुरुक्षेत्रावर सर्वाधिक राजकीय कुरघोड्या होण्याचा विक्रम या लोकसभा निवडणुकीमध्ये नोंदला जाण्याची शक्यता आहे. ही परिस्थिती लक्षात घेऊनच भारतीय जनता पार्टीनेसुध्दा या प्रदेशावर लक्ष केंद्रीत केले. आणि सबका साथ सबका विकास या घोषणेपेक्षाही उत्तरप्रदेशात राम मंदिराची लाट निर्माण करण्याचा प्रयत्न केला एवढेच नव्हे तर अनेक शहरांची नावे बदलून भावनिक वातावरण तापवण्याचा प्रयत्न केला आहे. दुर्दैवाने त्याला लोकांचा पुरेसा पाठिंबा मिळू शकलेला नाही. आता केवळ शेतकरी आणि तरूण वर्गाला आकर्षित करण्यासाठी सेवासुविधा आणि सवलतींच्या घोषणा कराव्या लागतील. कदाचित प्रियांका गांधींचे हे पदार्पण लक्षात घेऊन तितकाच तगडा उमेदवार उभा करण्याकरीता भाजपाला पराकाष्ठा करावी लागेल. म्हणूनच या आगामी अर्थसंकल्पामध्ये स्वतःच्या राजकीय प्रतिकुलतेवर मात करण्यासाठी सोयीसुविधा आणि सवलतींचा वर्षाव करावा लागेल. एक गोष्ट मात्र खरी की प्रियंका गांधींच्या आगमनामुळे भाजपाला कडवा संघर्ष करावा लागेल. राहुल गांधी यांनी जाणीवपूर्वक प्रियंका गांधी यांना केवळ उत्तरप्रदेशाच्या महासचिवाची जबाबदारी सोपवून याच राज्यावर काँग्रेसने लक्ष केंद्रित केले असल्याचे राजकीय संकेतच दिले आहेत.